www.maharashtratimes.com
एकमेव निःपक्ष वृत्तपत्र
# महाराष्ट्र टाइम्स
नागपूर । बुधवार, २८ मार्च २०१८ । पाने १२ + ६ (नागपूर प्लस) । शहर आवृत्ती । ₹ ३.००
अभिनयाने मि

## वारांगनांना शिक्षणाची कवाडे खुली

### पहिल्या टप्प्यात सात जणींनी घेतला प्रवेश

म.टा. प्रतिनिधी, नागपूर

समाजाच्या दृष्टीने कायम तिरस्कारयुक्त नजरांचा अनुभव घेणाऱ्या वारांगनांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या (इग्नू) नागपूर विभागीय केंद्राने केला आहे. केंद्राच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळाले असून पहिल्या टप्प्यात सात वारांगनांनी इग्नूच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला आहे.

नागपूर मधील इतवारी भागात गंगा-जमुना ही वारांगनांची वस्ती आहे. असे सांगण्यात येते की, तीनशे वर्षांपूर्वी येथे गंगा आणि जमुना या दोन देवदासी राहत होत्या. देवाच्या स्तुतीमध्ये गायन करणे हा त्यांचा व्यवसाय होता. त्यानंतर या दोघींनी इथे नाचगाण्याचा कार्यक्रम सुरू केला आणि या दोघींच्या नावावरून या वस्तीला नाव मिळाले. तर काहींच्या मते, नागपुरातील काही श्रीमंत व्यक्तींच्या घरी नाचगाण्या शिवाय काम करत असे त्या इथे स्थायिक झाल्या व ही वस्ती सुरू झाली. आजघडीला या वस्तीत दोन हजार वारांगना राहतात. या महिलांनी देखील शिक्षण घेऊन वेश्या व्यवसायातून बाहेर पडावे या उद्देशाने इग्नूने रेडक्रॉस सोसायटीच्या मदतीने दोन वर्षांपूर्वी येथे कार्य सुरू केले. वारांगनांची मानसिकता समजून घेत त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून देण्यात आले. यासाठी तब्बल दोन वर्षांत १५ बैठका घेण्यात आल्या. परिणामतः पहिल्या टप्प्यामध्ये सात जणींनी इग्नूच्या पूर्व तयारी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला आहे. इग्नूने तयार केलेला पूर्व तयारी अभ्यासक्रम हा शिक्षण अर्धवट सोडलेल्या तसेच कधीही शाळेत न गेलेल्यांसाठी उपयुक्त आहेत.



> इग्नुद्वारे कायमच वंचितांपर्यंत शिक्षण पोहचविण्याचा प्रयत्न झाला आहे. याच अंतर्गत वेश्यावस्तीतील महिलांना शिक्षित करण्याचा विचार आला. या वस्तीमध्ये कार्यरत असलेल्या रेडक्रॉस सोसायटीच्या मदतीने कार्य सुरू आहे.
>
> - डॉ. पी. शिवस्वरूप, संचालक इग्नू विभागीय केंद्र

या अभ्यासक्रमानंतर विद्यार्थ्याला पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता येतो. पूर्व तयारी अभ्यासक्रम हा सहा महिन्यांचा असून यानंतर सातही वारांगनांना बी.ए., बी.कॉम या पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येणार आहे.